सद्रक्षणाय खलनिग्रहणाय्

महाराष्ट्र शासन
**पोलीस विभाग**
पोलीस उप आयुक्त(अभियान),
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय,
डॉ. डी.एन. रोड, मुंबई-४००००१
Email- cp.mum.dcpops@mahapolice.gov.in

दिनांक : २४/०८/२०२४

# प्रेस नोट

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई व मा. विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या आदेशान्वये बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत आज दिनांक २४/०८/२०२४ रोजी सर्व पोलीस ठाण्यांमध्ये महिलांकरीता तक्रार निवारण दिनाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर आयोजित तक्रार निवारण दिनाच्यावेळी पोलीस ठाणे हद्दीतील महिला अत्याचाराच्या संदर्भात दाखल गुन्हे/तक्रारींमधील एकुण १४५२ फिर्यादी/तक्रारदार हजर होते. त्यापैकी १०८४ महिला फिर्यादी/तक्रारदार व १२८ जेष्ठ नागरीक हजर होते.

महिला तक्रार निवारण दिनाच्या अनुषंगाने बृहन्मुंबई पोलीस दलातील ०५ पोलीस सह आयुक्त, ०८ अपर पोलीस आयुक्त व ३३ पोलीस उप आयुक्त यांनी ९१ पोलीस ठाणेस भेटी देवून पोलीस ठाणेस दाखल असलेल्या महिलांविरूध्दच्या गुन्हे/तक्रारीमधील फिर्यादी/तक्रारदार यांना पोलीस ठाणेस बोलावून त्यांचे गुन्हा/तक्रारीच्या अनुषंगाने मार्गदर्शन व समुपदेशन केले. मा. वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे विभागीय सहायक पोलीस आयुक्त व पोलीस ठाण्यांचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी कार्यवाही केली.

बृहन्मुंबई हद्दीतील सर्व नागरीकांना महिलांच्या संदर्भातील तक्रारींच्या अनुषंगाने हेल्पलाईन नं. १०९०, डायल १००/११२ तसेच मुख्य नियंत्रण कक्षाचे दुरध्वनी क्र. ०२२-२२६४१७५२ यावर संपर्क करण्यासाठी आवाहन करण्यात येत आहे.

०-०-०